# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 15 March 2024**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ मार्च २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोग उद्या जाहीर करणार
- एस.टी.च्या एलएनजी इंधनावरील वाहन रुपांतर प्रकल्पाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन
- एकोणीसाव्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य २०२३-२४ युवक महोत्सवाचा समारोप

आणि

- उडान योजनेअंतर्गत नांदेड इथली विमानसेवा येत्या ३१ मार्चपासून पूर्ववत

****

आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोग उद्या जाहीर करणार आहे. उद्या दुपारी नवी दिल्लीत होणारी ही पत्रकार परिषद समाजमाध्यमांवर थेट प्रसारित करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं ट्वीटरवर दिली आहे. दरम्यान, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांनी आज पदभार स्वीकारला. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी या दोघांचं स्वागत केलं.

दरम्यान, केंद्रीय निवडणूक आयोगानं निवडणूक रोख्यांची माहिती आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भारतीय स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांची सर्व माहिती परवा आयोगाला दिली. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान खरेदी झालेल्या आणि वठलेल्या निवडणूक रोख्यांची माहीती बँकेनं दिली आहे.

****

आगामी लोकसभा निवडणूक आपण लढवणार नसल्याचं माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी स्पष्ट केलं आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपण हा निर्णय घेतल्याचं, खडसे यांनी सांगितलं. आज मुंबईत यशवंतराव चव्हाण सेंटर इथं पक्षाचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आपल्या कन्या रोहिणी खडसे यासुद्धा निवडणूक लढवणार नसल्याचं खडसे यांनी नमूद केलं.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज मुंबई महापालिकेच्या आकांक्षित महिला सक्षमीकरण योजनेचा शुभारंभ करण्यात आला. याअंतर्गत विविध शासकीय योजनांद्वारे घेतलेल्या कर्जाच्या परत फेडीसाठी महिला बचतगटाला प्रति बचतगट एक लाख रुपये अर्थसहाय्य केलं जाणार आहे. मुद्रा योजना तसंच स्वनिधी योजनेअंतर्गत दहा हजार रुपये कर्जासाठी दोन हजार रुपये तर २० हजार रुपये कर्जासाठी चार हजार रुपये आर्थिक मदत केली जाईल. आज ७० हजार महिलांना या योजनेचा लाभ देण्यात आला. या कार्यक्रमाला मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंह चहल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

****

एस.टी महामंडळाच्या एलएनजी इंधनावरील वाहन रुपांतर प्रकल्पाचं, आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं. एलएनजी रूपांतरणामुळे एसटी बसमधील बदल, डिझेलच्या तुलनेत होणारे लाभ याविषयी मुख्यमंत्र्यांनी माहिती घेतली. महामंडळाकडे डिझेलवर चालणारी सुमारे १६ हजार प्रवासी वाहनं आहेत. महामंडळाच्या एकूण खर्चापैकी सुमारे ३४ टक्के खर्च हा डिझेलवर केला जातो. टप्प्याटप्प्याने एस.टी महामंडळातील सर्व वाहनं एलएनजी इंधनावर रुपांतरित करण्यात येणार असल्याचं यावेळी सांगण्यात आलं. एस टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

****

आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेअंतर्गत राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान निधी अकरा हजार रुपयांवरून वीस हजार रुपये करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी केलेल्या

मागणीनुसार वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ही योजना राबवण्यात येते. शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीतील ५० कोटी रुपयांच्या मुदत ठेवीवरील व्याजाच्या रकमेतूनच ही रक्कम देण्यात येईल. थेट लाभ हस्तांतरण योजनेनुसार सन्माननिधीची रक्कम संबंधित पत्रकारांच्या बँक खात्यात जमा होईल.

****

वस्त्रोद्योग विभागाच्या एकात्मिक आणि शाश्वत वस्त्रोद्योग धोरणानुसार, विविध योजनांकरिता ई–टेक्सटाईल पोर्टल तयार करण्यात येत आहे. विविध योजनांमधील लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून त्यांना अर्थसहाय्य वितरीत करण्यापर्यंतची सर्व कार्यवाही या प्रणालीमार्फत करण्यात येणार आहे. ही प्रणाली विकसित करण्यासंदर्भात वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत वस्त्रोद्योग विभाग आणि आयसीआयसीआय बँक यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी सर्व नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

**बाईट – विष्णू मनोहर, प्रसिद्ध शेफ**

****

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित, एकोणीसाव्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य २०२३–२४ युवक महोत्सवाचा आज समारोप झाला. प्रख्यात अभिनेत्री तथा लेखिका सोनाली कुलकर्णी या समारोप सोहळ्याला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. युवकांनी स्वतःला ओळखावं आणि कोणाला हरवण्यापेक्षा कलेतला आनंद जाणून घ्यावा, असा सल्ला, त्यांनी युवकांना दिला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विजय फुलारी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात गेल्या ११ मार्चपासून पाच दिवस चाललेल्या या महोत्सवात २४ विद्यापीठांच्या आठशे पंचाहत्तर विद्यार्थ्यांनी तीस कला प्रकारात आपली कला सादर केली. स्पर्धेमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'उडे देश का आम आदमी' अर्थात उडान या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत नांदेड इथून विमानसेवा पूर्ववत होत आहेत. नांदेड–हैद्राबाद आणि नांदेड–अहमदाबाद ही दोन विमानं ३१ मार्चपासून नियमितपणे सुरू होणार असून, बंगळुरू–नांदेड–जालंदर विमानसेवाही लवकरच सुरू होणार असल्याची माहिती खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.

****

महाराष्ट्र शासनाच्या वतीनं सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्याबद्दल दिला जाणारा शाहू–फुले–आंबेडकर सामाजिक पुरस्कार २०२१–२२ या वर्षासाठी, जय विश्वकर्मा सर्वोदय संस्थेस तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार विलास चंदने यांना प्रदान करण्यात आला. मुंबईत झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात जय विश्वकर्मा सर्वोदय संस्थेच्या अध्यक्षा मंदाकिनी चौकडे तसंच संचालक विलास चंदने यांनी हा पुरस्कार स्वीकारला

****

लोकसभा निवडणुकीत दिव्यांगांची टक्केवारी आणि सहभाग वाढवण्यासाठी परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीनं आज दिव्यांग मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. या फेरी आणि चित्ररथाला जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. मतदान केंद्रांवर दिव्यांगांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, पाणी, तसंच वाहतूक व्यवस्था करण्यात येणार आहे, तसंच निवडणूक आयोगाच्या सक्षम ॲपच्या माध्यमातून अडीअडचणी सोडवण्यासाठी मदत होणार आहे. दिव्यांगाच्या मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात असल्याची माहिती जिल्हाधिकारी गावडे यांनी दिली.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या धार्मिक तसंच ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळावी अशी मागणी पर्यटन जनजागृती संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे. आज धाराशिव इथं पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे याबाबतचं निवेदन सादर करण्यात आलं.

****

नांदेड इथं ट्रक आणि दुचाकीच्या धडकेत दोन जणांचा मृत्यू झाला. अर्धापूर तालुक्यातील भोगाव इथले रहिवासी दाजीबा शंकरराव गाढे आणि त्यांचा मुलगा गोपीनाथ गाढे हे दोघे दुचाकीवर नांदेडला जात असताना, आसना नदीच्या पुलावर

हा अपघात झाला, या दोघांना जखमी अवस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात नेलं असता डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केलं.

****

अंबाजोगाई इथल्या स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील वर्ग–१, वर्ग–२ अधिकाऱ्यांची निवासस्थाने आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या वसतिगृहासाठी राज्य सरकारने १०२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निवासस्थानांच्या बांधकामाला लोकसभा निवडणुकीनंतर सुरुवात होणार असल्याची माहिती आमदार नमिता मुंदडा यांनी दिली आहे.

****